**कृपया प्रसिद्धीसाठी** **28 मे 2014**

## स्वा. सावरकरांच्या काँग्रेसने काढून टाकलेल्या काव्यपंक्ति अंदमानच्या स्वातंत्र्यज्योत स्मारकात सन्मानपूर्वक पुनर्स्थापित करा : राम नाईक

**मुंबई, बुधवार :** काँग्रेसचे पेट्रोलियम मंत्री श्री. मणिशंकर अय्यर यांनी उद्दामपणे अंदमानातील स्वातंत्र्यज्योतीच्या शिल्पावरील स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या काढून टाकलेल्या काव्यपंक्ति मोदी सरकारने सन्मानपूर्वक पुनर्स्थापित कराव्यात, अशी विनंती पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांना माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी स्वा. सावरकरांच्या जयंतीच्या निमित्ताने केली आहे.

आज प्रसिद्ध केलेल्या पत्रकात या संदर्भात माहिती देताना श्री. राम नाईक म्हणाले, ‘‘पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांना शपथविधीनंतर दिलेल्या अभिनंदनाच्या पत्रात मी ही विनंती केली आहे. राष्ट्रीय अस्मितेचा आणि कोट्यावधी देशवासियांच्या जिव्हाळ्याचा हा विषय आहे. मी पेट्रोलियम मंत्री असताना अंदमानातील मध्यवर्ती कारागृहात इंडियन ऑईल फाऊंडेशनतर्फे सतत तेवणा-या स्वातंत्र्यज्योतीचे शिल्प निर्माण करण्याचा निर्णय झाला. या ज्योतीच्या शिल्पाच्या चारी बाजूंना स्वातंत्र्यवीर सावरकर, मदनलाल धिंग्रा, बहादुर शहा जाफर, नेताजी सुभाषचंद्र बोस व भगतसिंग यांची उद्धरणे लावायचे ठरले. त्याप्रमाणे ती तयारही केली. वर्ष 2004 मध्ये हे शिल्प तयारही झाले. परंतु निवडणूक आचार संहितेमुळे त्याचे उद्‌घाटन होऊ शकले नाही. निवडणुकीनंतर काँग्रेसचे सरकार आले. 9 ऑगस्ट 2004 रोजी तत्कालिन पेट्रोलियम मंत्री श्री. मणिशंकर अय्यर यांनी या ज्योती शिल्पाचे उद्‌घाटनही केले. स्वातंत्र्यज्योतीवर सावरकरांच्या पुढील काव्यपंक्ती कोरण्यात आल्या होत्या.

कीं घेतले व्रत न हें अम्हि अंधतेनें ।
लब्धप्रकाश इतिहास - निसर्ग मानें ।।
जें दिव्य दाहक म्हणूनि असावयाचें ।
बुद्धयाचि वाण धरिले करिं हें सतीचें ।।

परंतु उद्दामपणे श्री. मणिशंकर यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या त्या काव्यपंक्ती काढून टाकल्या. त्याविरुद्ध देशभर तसेच संसदेतही तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. आंदोलने झाली. परंतु तरीही संवेदनशून्य काँग्रेस सरकारने सावरकरांच्या काव्यपंक्ति पुनर्स्थापित करुन राष्ट्रीय अस्मिता कायम राखण्याचे सौजन्य दाखविले नाही. जणू हे काम श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणेच नियतीला हवे होते. म्हणूनच आता मी श्री. मोदी यांचे लक्ष या विषयाकडे पुन्हा वेधून त्यांना विनंती केली आहे. ते निश्चित यावर कारवाई करतील असा मला विश्वास वाटतो’’.

‘‘पेट्रोलियम खात्याचा स्वतंत्र प्रभार राज्यमंत्री श्री. धर्मेंद्र प्रधान यांना सोपविण्यात आला आहे. आज स्वातंत्र्यवीर सावरकर जयंतीदिनी त्यांनीही यात पुढाकार घ्यावा’’, अशी विनंतीही दूरध्वनीवरुन श्री. राम नाईक यांनी केली आहे.

**(कार्यालय सचिव)**